नियमीत दिवाणी दावा क्र.१००/२०२३
सुधाकर वि. नारायण
निशाणी २२/ क सोबत

<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. १ नारायण बापुराव पाथ्रीकर बनसोड यांचा साक्षीपुरावा</u>

<u>मी शपथेवर निवेदन करतो की,</u>

<u>साक्षीदाराचा पुढील सरतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.एस. एस. पाटील यांच्या मार्फत</u>

१२. आता मला माझे दि.१७.१०.२०१३ रोजीचे खरेदी खत दाखवण्यात आले. त्याला <u>नि.क्र.२३</u> देण्यात येते.

सरतपास पुर्ण**...**

<u>उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एन. बी. सोनवणे यांच्या मार्फत</u>

१३. गट नं.३२ मधील २२ गुंठे जमीन विमलबाई यांनी माझ्या वडीलांकडुन खरेदी केली आहे, हे म्हणणे खरे आहे. विमलबाई यांनी २२ गुंठे जमीन घेतल्यानंतर ती व तिचे घरचे लोक वहिती करत होते, हे म्हणणे खरे नाही. विमलबाई यांनी वाद मिळकत वादी यांना दि.१७.०५.२००२ रोजी विक्री केली, हे म्हणणे खरे आहे. गट नं.३२ मध्ये खरेदी पत्राप्रमाणे विमलबाई व त्यानंतर वादी यांच्या नावाची नोंद झाली, हे म्हणणे खरे आहे. दोन्ही खरेदी पत्रासंदर्भात अथवा नोंदीबाबत मी व माझ्या बहिणींनी कोणताही आक्षेप घेतलेला नाही, हे म्हणणे खरे आहे.

१४. मी गट नं.३२ मधील १० आर जमीन वडीलांकडुन विकत घेतली त्यावेळी सदर गट नंबरची मोजणी केलेली नाही. १० आर जमीनीबाबत वडीलांकडुन ताबा पावती केलेली नाही. सदर खरेदी केलेल्या जमीनीच्या चतु:सिमा चुकीच्या आहेत, हे म्हणणे खरे आहे. खरेदी केलेल्या जमीनीच्या ख-या चतु:सिमा कोणत्या त्या संदर्भात

माझ्या जबाबात व शपथपत्रात नमुद नाही, हे म्हणणे खरे आहे. खरेदी केलेल्या मिळकतीच्या चतु:सिमेबाबत कागदपत्र दाखल केलेला नाही.

१५. हरीकिसन आप्पा पाथ्रीकर व इतर व्यक्तींनी मी खरेदी केलेल्या जमीनी अतिक्रमण केल्यामुळे मी सन २०१४ साली खरेदी केलेल्या मिळकतीची मोजणी होवुन मिळण्याकरीता अर्ज केला होता, हे म्हणणे खरे आहे. मोजणी करीता मोजणी अधिकारी हे जाग्यावर येवुन पाहणी करुन पंचनामा तयार केला, त्यामध्ये त्यांनी असा उल्लेख केला की, मी खरेदी केलेल्या मिळकतीची नोंद ७/१२ उता-यावर आहे, परंतु प्रत्यक्षात माझ्याकडे ताबा नसल्याने मोजणी करीता आले नाही, हे म्हणणे खरे आहे. त्यानंतर नियमित दिवाणी दावा क्र.७०/२०२२ हा दाखल केला होता.

१६. मी खरेदी केलेली जमीन प्रत्यक्ष माझ्या ताब्यात नाही, हे म्हणणे खरे नाही. मी खरेदी केलेली जमीन माझ्या ताब्यात नसल्यामुळे भावाच्या २२ आर जमीनीपैकी १० आर जमीनीवर माझी जमीन समजुन मी अतिक्रमण केले, हे म्हणणे खरे नाही. मी अथवा माझ्या बहिणीने दावा मिळकतीच्या वाटणी संदर्भात दावा दाखल केलेला नाही. मी वाद मिळकतीवर ताबा केल्याबाबत वादी यांनी माझ्या विरुध्द जिल्हाअधिकारी, तहसिलदार यांच्याकडे लेखी तक्रार केली होती, हे म्हणणे खरे नाही. शपथपत्रातील परिच्छेद क्र.५ मधील मजकुराबाबत माझा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही, हे म्हणणे खरे आहे. वाद मिळकतीवर ताबा केल्याबाबत पोलीस ठाण्यात माझ्या भावाने तक्रार केली होती त्या संदर्भात मला पोलीस ठाण्यात बोलवण्यात आले होते, हे म्हणणे खरे आहे. वडीलांनी मला करुन दिलेले खरेदी पत्र फक्त कागदोपत्री झाले, हे म्हणणे खरे नाही. खरेदी केलेली जमीन समजुन मी दावा मिळकतीमध्ये १० आर जमीनीवर अतिक्रमण केले, हे म्हणणे खरे नाही. माझी १० आर जमीन कोठे आहे

हे मला माहित नसल्यामुळे मी त्याच्या चतु:सिमा नमुद केलेल्या नाहीत, हे म्हणणे खरे नाही. वाद मिळकत वडीलोपार्जीत आहे, त्यामध्ये समान हिस्सा आहे, हे मी खोटे सांगत आहे, हे म्हणणे खरे नाही. माझया शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खोटा आहे, हे म्हणणे खरे नाही. आजरोजी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

उलटतपास पुर्ण**.....**

फेरतपास नाही**...**

**फुलंब्री** **श्रवणोत्तर स्विकृत**

दि. ०७/०४/२०२६. सदरचा जबाब माझ्या समक्ष नोंदवण्यात आला.

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL Date: 2026.04.07 17:46:21 +0530

**(चंद्रकांत रामचंद्र पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**फुलंब्री**